International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# समकालीन मराठी साहित्याचे माध्यमांतर

**डॉ. रेखा काशिनाथ पसाले**

*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख, आर्टस् अँन्ड कॉमर्स कॉलेज,कासेगाव*

*Corresponding Author - डॉ. रेखा काशिनाथ पसाले*

DOI - 10.5281/zenodo.10873425

**प्रस्तावना :**

*आज मराठी सिनेमा समृद्ध होताना दिसतो आहे. ज्या पद्धतीने साहित्य हा समाजजीवनाचा आरसा आहे असं मानलं जात; अगदी त्याचप्रमाणे चित्रपटही समाजजीवनाचा आरसा आहे असं मानलं जातं. कारण चित्रपटाच्या माध्यमातून समाजजीवनातील अनेक गोष्टींवर भाष्य केले जाते. याला मराठी चित्रपटही अपवाद नाही ज्या पद्धतीने साहित्य हे समाजात परिवर्तन घडवत असते अगदी त्याचप्रमाणे चित्रपटही समाजामध्ये परिवर्तन घडवत असतात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय धार्मिक, आर्थिक परिस्थितीत काळानुरूप घडणारे बदल चित्रपट या माध्यमाद्वारे प्रतिबिंबित होताना दिसतात. दिग्दर्शक, निर्माता, लेखक हे त्या त्या काळाला अनुरूप असे भाष्य चित्रपटांमधून करताना दिसतात, प्रस्तुत ठिकाणी मराठी साहित्य आणि मराठी चित्रपट या अनुषंगाने काही विचार मांडला जाणार आहे. कथा कादंबरी, कविता, नाटक, आत्मकथन या साहित्यप्रकारावर आधारित असणारे चित्रपट यांची चर्चा प्रस्तुत निबंधात घेतली जाणार आहे. तसेच चित्रपटाचं माध्यमांतर याविषयाच्या अनुषगाने मांडणी केली जाणार आहे, तसेच मराठी साहित्याने चित्रपट निर्मितीला कसे योगदान दिले याचाही आढावा प्रस्तुत ठिकणी घेतला जाणार आहे.*

---

**उद्दिष्टे :**

- .मराठी साहित्य आणि मराठी चित्रपट यांच्यातील सहसंबध अभ्यासणे.
- .मराठी साहित्याचा मराठी चित्रपटावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.
- मराठी साहित्याच्या माध्यमांतराचे स्वरूप अभ्यासणे.

**विषयविवेचन :**

१९१३ साली दादासाहेब फाळके यांनी 'राजा हरिश्चंद्र' या पहिल्या मूकपटाद्वारे भारतीय चित्रपटांची मुहूर्तमेढ रोवली, आणि भारतात चित्रपटयुगाचा प्रारंभ झाला. या घटनेला आता बराच काळ झाला आहे. साधारण १०० वर्षाचा काळ लोटून गेला. चित्रपट या माध्यमाने सर्व भारतीयांना एवढं वेढ लावलं की तो त्यांच्या रोजच्या जगण्याचा एक भाग होऊन बसला. त्यांची मानसिक आंदोलनं, त्यांची प्रगल्भता, या साऱ्याच्या

घडणीत चित्रपटांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याचबरोबर सिनेमा माध्यमामध्येही काळाबरोबर आशय, विषय, तंत्र मंत्र, सादरीकरण, पटकथा, संवाद, पात्र, लोकशन यामध्येही अमुलाग्र स्थित्यंतरे घडून आली आहेत असे दिसते. हिंदी चित्रपटांपाठोपाठ प्रादेशिक भाषांमधील चित्रपटांनी आज वेगळीच उंची गाठली आहे असे म्हणावे लागेल. तसेच प्रेक्षकांना नव्या गोष्टी अनुभवण्याची संधी हे चित्रपट देत असतात. त्यामध्ये मराठी चित्रपटही मागे नाही. जगभरामध्ये दखल घेतली जावी असा मराठी सिनेमा अलीकडच्या काळात बनवला जात आहे. सर्वच पातळीवर आज मराठी सिनेमा समृद्ध होताना दिसतो आहे.

मुळात साहित्य आणि चित्रपट या दोन वेगवेगळ्या कला आहेत शब्द ही साहित्याची महत्त्वाची बाजू आहे, तर दृश्य ही चित्रपटाची अर्थात चित्रपटामध्येही संवाद असतात पण ते असले पाहिजेत असंही काही नाही संवादाशिवायही एखादा दिग्दर्शक खूप काही सांगून जातो. येथे दिग्दर्शक आणि निर्माता यांना काही दाखवायचे असते आणि प्रेक्षकांना काही बघायचे असते असे आपल्याला म्हणता येईल, साहित्यकृतीवर चित्रपट येण्याची परंपरा मराठीमध्ये आचार्य प्र. के अत्रे यांच्या ‘श्यामची आई’ (१९५३) या चित्रपटापासून सुरू झाली. साने गुरूजींच्या ‘श्यामची आई' या साहित्यकृतीवर अत्र्यांनी हा चित्रपट बनवला आणि मराठी चित्रपटाचा एक नवा इतिहासात रचला. पहिल्याच वर्षी या चित्रपटास सर्वोत्कृष्ट भारतीय सिनेमाचं पारितोषक मिळाले. परीक्षक निवड समितीमध्ये एकही मराठी सदस्य नसताना ‘श्यामची आई’ ला स्वतंत्र भारतातले पहिले राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाले. याचाच अर्थ चित्रपटाच्या पटकथेत इतके सामर्थ्य आहे की अमराठी सदस्यांनाही तो भावला. याने सर्व श्रेय साने गुरूजी व प्र. के. अत्रे यांच्या लेखनातील सामर्थ्याला जाते. त्याच्यानंतर मराठीमध्ये सकस चित्रपट आले नाहीत असे नाहीं, पण तरीही हा पुरस्कार मिळवण्यासाठी तब्बल पन्नास वर्ष महाराष्ट्राला वाट पहावी लागली. २००४ मध्ये संदीप सावंतच्या 'श्वास' या चित्रपटास सुवर्णकमळ जाहीर झाले. त्यानंतर मराठी सिनेमाला सुवर्णकमळासाठी फारसी वाट पहावी लागली नाही. आज मराठी सिनेमाची क्षितिज विस्तारली गेली आहेत, असेच विधान करावे लागेल.

१९६० नंतरचे साहित्य खऱ्या अर्थाने समकालीन साहित्य मानले जाते. साठोत्तरी कालखंडात जे दलित, स्त्रीवादी, ग्रामीणसा साहित्य प्रवाह निर्माण झाले ते आपल्या काळाशी आणि त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीशी जवळ जाणारे आहेत. समकालीन हा कालवाचक शब्द असून ‘सम’ म्हणजे समान, समांतर साहित्य आपल्या काळाबरोबर असते. ज्या काळात ते निर्माण झाले असते त्या काळातील समाजाचे प्रतिबंब त्यात पडते. तसेच त्यावर त्या काळातील विचारप्रणालींचा प्रभाव पडतो. त्या काळातील लोकांच्या मानसिकतेच्या जाणीवांचा परिपाक त्यामध्ये असतो. त्याचे चित्रण साहित्यात

पडते, त्यामुळे ते साहित्य 'समकालीन' म्हणता येईल. या साहित्याचे कालखंड पुढीलप्रमाणे आहे.

**१९६० ते १९८० दरम्याच्या साहित्यातील माध्यमांवर :**

मराठी कादंबरीवर आधारित अनेक मराठी चित्रपटांची निर्मिती झाली आहे. यामध्ये प्रारंभी उल्लेख करावा लागेल तो म्हणजे अण्णा भाऊ साठेंचा. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर सकस असे मराठी चित्रपट निर्माण झाले. त्यामध्ये वैजयंता (वैजयंता), आवडी (टिळा लाविते मी रक्ताचा), माकडीचा माळ (डोंगरची मैना), चिखलातील कमळ (मुरळी मल्हारी रायाची), वारणेचा वाघ (वारणेचा वाघ), अलगूज (अशी ही साताऱ्याची तऱ्हा), फकिरा (फकिरा) या कादंबऱ्यांचा समावेश होतो. अण्णाभाऊच्या लेखनात ऐवढे सामर्थ्य होते की, त्यांच्या काही चित्रपटास अनेक पुरस्कार मिळाले. 'वैजयंता' चित्रपटास १९६१-६२ या वर्षीचे 'सर्टिफिकेट ऑफ मेरिट' हे उत्कृष्ट मराठी चित्रपटाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. 'वारणेचा वाघ' या चित्रपटास १९७०-७१ या वर्षीचे महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट मराठी चित्रपट क्रमांक दोनचे पारितोषिक तसेच 'अशी ही साताऱ्याची तऱ्हा' या चित्रपटास १९७३-७४ या वर्षीचे महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट मराठी चित्रपट क्रमांक तीनचे पारितोषिक मिळाले. (डांगळे, उपाध्ये २००६ : ११८३)

अरूण साधु यांच्या 'सिंहासन' आणि 'मुंबई दिनांक' या कादंबरीवर आधारित जब्बार पटेल यांनी सिंहासन (१९७९) या चित्रपटाची निर्मिती केली. हा चित्रपटही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. तसेच गो. नी. दांडेकर यांच्या 'जैत रे जैत' या कादंबरीवर आधारलेला 'जैत रे जैत' हा चित्रपट रूपेरी पडद्यावर आणला. जब्बार पटेल यांनी आपल्या कारकिर्दीत उत्कृष्ट आणि सर्जनशील कलाकृती दिल्या. कादंबरी कथानकातील आशय विषयात असणारी ताकद ओळखून त्यानी साजेशी आणि तेवढ्याच ताकदीचे कलावंत निवडले. अगदी स्मिता पाटील, निळु फुले, डॉ. श्रीराम लागू, गिरीश कर्नाड, ना. धो. महानोर, पं. हृदयनाथ मंगेशकर यासारख्या मात्तब्बर कलावंताचा सहभाग त्यांच्या चित्रपटांना वेगळयान उंचीवर नेऊन ठेवतो. चित्रपट निर्मितीसाठी निवड केलेल्या मराठी कादंबऱ्या आणि चित्रपट निर्मितीमधील पटेलांचा व्यासंग यामुळे त्यांच्या चित्रपटांना राज्यशासनाचे पुरस्कारही मिळाले. सहाजिकच त्यांचे सर्व चित्रपट प्रेक्षकांच्या तेवढ्याच पसंतीस उतरले.

श्री. ना. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू' या कांबरीवर १९८० मध्ये 'गारंबीचा बापू' हा चित्रपट तयार झाला. याचा परिणाम असा की ग्रामीण जीवन केंद्रस्थानी असणाऱ्या कादंबऱ्यावर चित्रपटनिर्मिती पुढच्या काळात होत राहिली. व्यंकटेश माडगूळकर लिखित 'बनगरवाडी' कादंबरीवर 'बनगरवाडी' हा चित्रपट अमोल पालेकरांनी निर्माण केला. आनंद यादव यांच्या 'नटरंग' या कादंबरीवर आधारित रवी जाधव यांनी दिग्दर्शित केलेला 'नटरंग' हा चित्रपट मराठी सिनेसृष्टीत आपला स्वतंत्र ठसा उमटवून गेला. कलेशी इमान राखताना वैयक्तिक आणि कौटुंबिक पातळीवर गुणवंत कागलकर याची होणारी परवड मराठी मनाला भावस्पर्शी करून

गेली. ग्रामीण आणि तमाशाप्रधान चित्रपटाची मोहिनी प्रेक्षकांच्या मनात निर्माण करण्याची किमया या चित्रपटाने केली असे म्हणता येईल. या चित्रपटातील कथा, संगीत, गीत, अभिनय अशा विभागांना पुरस्कार प्राप्त झाले. २००९ मध्ये 'जोगवा' या मराठी चित्रपटाने मराठी सिनेमाला राष्ट्रीय पातळीवर नेले. हा चित्रपट राजन गवस यांच्या ‘चौंडक', आणि 'भंडारभोग' या दोन कादंबऱ्या तसेच चारूता सागर यांची ‘कथा’ या साहित्यकृतीवर आधारित आहे. या चित्रपटानेही पाच राष्ट्रीय पुरस्कार मिळविले. रमेश इंगळे उत्रादकर यांच्या 'निशाणी डावा अंगठा' या गाजलेल्या कादंबरीवरील त्याच शीर्षकाचा 'निशाणी डावा अंगठा' हा चित्रपट येऊन गेला.

**२०१० ते २०१५ या कालखंडातील साहित्याचे माध्यमांवर :**

सुहास शिरवळकर यांच्या लोकप्रिय 'दुनियादारी' या कादंबरीवर आधारित २०१३ मधील ‘दुनियादारी' चित्रपटही मराठी रसिकांना वेड लावून गेला. संजय जाधव यांनी मराठी सिनेसृष्टीतील अलिकडच्या आघाडीच्या कलाकारांना घेऊन हा चित्रपट बनविला. या चित्रपटाने तरुणाईच्या मनाचा वेध घेत सुपरहिट होण्याचा मान मिळविला. तसेच मिलिंद बोकिल यांच्या 'शाळा' या बहुचर्चित कादंबरीवर सुजय डहाके यांनी त्याच शीर्षकाचा चित्रपट बनवला. या चित्रपटानेही राष्ट्रीय पुरस्कारवर आपली मोहर उमटविली. शांता गोखले यांच्या 'रीटा वेलिणकर' या कादंबरीवर 'रीटा' हा चित्रपट निर्माण केला. विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा' या कादंबरीवर राजीव पाटील यांनी २०१० मध्ये 'पांगिरा' नावाचा चित्रपट बनविला. या चित्रपटाने सामान्य शेतकऱ्यांऱ्याचे दाहक जीवनाचे चित्र प्रेक्षकांसमोर ठेवले. या काळामध्ये ग्रामीण जीवनाला केंद्रिभूत ठेऊन अनेक मराठी चित्रपटांची निर्मिती झाली आणि आजही होत आहे, ही गोष्ट येथे नमूद करणे गरजेच वाटते.

**समकालीन मराठी कथांवरील चित्रपट माध्यमांवर :**

मराठी कादंबरीवर ज्याप्रमाणे चित्रपटनिर्मिती झाली, तशी मराठी कथा आणि नाटक या साहित्यप्रकारांवर आधारित चित्रपट निर्मिती झाल्याचे दिसून येते. ह. ना. आपटे यांच्या 'न पटणारी गोष्ट' या कथेवर व्ही. शांताराम यांनी 'कुंकू' नावाचा चित्रपट बनविला. चिं. वि. जोशी यांची 'सत्याचे प्रयोग' आणि राम गणेश गडकरी यांची 'ठकीचे लग्न' या कथांवर विश्राम बेडेकर यांनी सत्याचे प्रयोग व ठकीचे लग्न' असा दुहेरी रेषेत जाणारा मराठीतला पहिला सामाजिक आणि विनोदी चित्रपट बनविला. शंकर पाटील यांच्या कथेवर आधारित 'भूजंग' हा चित्रपट निर्माण झाला या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनाची चांगलीच पकड घेतली. चारूता सागर यांची 'दर्शन' आणि 'टाक' नावाची कथा 'जोगवा' चित्रपटासाठी निवडली गेली. व. पु. काळे यांच्या 'कुचंबणा' या कथेवरही चित्रपट तयार केला. गजेंद्र अहिरे यांनी त्यांच्याच 'शेवरी' या कथेवर बेतलेला 'शेवरी' हा चित्रपट

बनवला. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेवर 'कैरी' हा चित्रपट बनवला गेला. श्री. दा. पानवलकर यांच्या 'सूर्य' कथेवर बेतलेल्या 'अर्धसत्य' या हिंदी चित्रपटाचा उल्लेख करणे गरजेचे वाटते. एकूणच मराठी कथांवरही चित्रपट तयार करण्यात आले.

**समकालीन मराठी नाटकांवरील चित्रपट माध्यमांवर :**

मराठी नाटकाचे चित्रपटामध्ये रूपांतरण झालेले दिसून येते. सुरुवातीच्या काळात मामा वरेरकर यांचे 'सत्तेचे गुलाम' या नाटकावर आधारित 'कारस्थान' हा चित्रपट बनविण्यात आला. तसेच चि. य. जोशी यांच्या होनाजी बाळा' या नाटकावर मराठी चित्रपट क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा मानला गेलेला 'अमर भूपाळी' हा चित्रपट होय. वसंत जोगळेकर यांनी पु. ल. देशपांडे यांच्या 'सुंदर मी होणार' या नाटकावरही चित्रपट बनवला गेला. केदार शिंदे यांनी ‘लोच्या झाला रे' या नाटकावर 'खो खो' नावचा अलिकडेच चित्रपट बनविला. हरीभाऊ वडगावकर यांच्या 'गाढवाचं लग्न' या नाटकावर त्याच शीर्षकाचा ‘गाढवाचं लग्न' हा मराठी चित्रपट बनवण्यात आला. या अनुषंगाने विचार करताना वि. वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' या अजरामर कलाकृतीवर आधारित महेश मांजरेकर यांनी 'नटसम्राट' चित्रपट बनवला. नाना पाटेकर, विक्रम गोखले यांच्यासारख्या कलावंताना घेऊन गणपतराव बेलवलकर नव्या रूपात प्रेक्षकांसमोर ठेवला. महेश एलकुंचवार यांच्या 'पार्टी', 'गार्बो' या नाटकावरही हिंदीमध्ये चित्रपट बनविण्यात आले.

**समकालीन आतंकथनावरील चित्रपट माध्यमांवर :**

कथा, कादंबरी, नाटकाप्रमाणे आत्मकथनांवरही चित्रपट बनविण्यात आले. जब्बार पटेल यांनी १९८१ ला शांता निसळ यांच्या 'बेघर' या आत्मकथनावर आधारीत 'उंबरठा' या चित्रपटाची निर्मिती केली. अशोक व्हटकर यांच्या '७२ मैल एक प्रवास' या आत्मकथनावर त्याच शीर्षकाचा राजीव पाटील यांनी चित्रपट बनवला, तर सिंधुताई सपकाळ यांच्या आत्मकथनावर 'मी सिंधुताई... हा चित्रपट अलिकडच्या काळात बनवण्यात आला.

**समकालीन मराठी कवितांवरील चित्रपट माध्यमांवर :**

मराठी चित्रपट इतिहासात एक नवा प्रयोग करण्यात आला तो म्हणजे 'बायोस्कोप (२०१५) हा चित्रपट होय हा चित्रपट चक्क चार कवितांवर चार दिग्दर्शकांनी मिळून निर्माण केला. मराठीत असा पहिलाच प्रयोग म्हणावा लागेल, असा प्रयोग हिंदीत अलिकडच्या 'बॉम्बे टॉकिज' मधून झाला आहे. रवी जाधव (मित्रा), गिरीश मोहिते (बैल), गजेंद्रअहिरे (दिल ए नादान) आणि विजू माने (एक होता काऊ) या चौघांनी चार कविता घेऊन 'बायोस्कोप' ची निर्मिती केली.

**समारोप:**

एकूणच मराठी चित्रपटचा विचार करता मराठी चित्रपटाने मराठी महित्यावर आजवर अनेक चित्रपटांची निर्मिती केली आहे. त्यामुळे मराठी चित्रपट आणि मराठी साहित्य एकमेकास परस्पर पुरक असे आहेत असे म्हणावे लागेल कादंबरी, कथा, नाटक कविता या साहित्यप्रकारांचे चित्रपटांमध्ये माध्यमांतर झालेले दिसून येते.

**संदर्भ सूची :**

1. थोरात राजेंद्र, कसेबेकर आशुतोष, “साहित्यकृतीचे माध्यमांतर”, संस्कृती प्रकाशन ,पुणे. २०१७
2. के.श्रीलता विष्णू, “मिडिया और साहित्य समकालीन संदर्भ”, अमन प्रकाशन, २०२०
3. द.भि. कुलकर्णी, “समकालीन साहित्य प्रवृत्ती व प्रेरणा”, अभिनंदन ग्रंथ.
4. डांगळे अर्जुन व इतर (संपा), “लोकशाहिर अण्णा भाऊ साठे निवडक वाडमय”, महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६
5. मोतीराम कटारे, “ समकालीन साहित्य वेध’,प्रतिभा प्रकाशन, २०२०